admn 19-20


MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१११९/१८५३/२०१९

दि. ०८ ऑगस्ट,२०१९

## परिपत्रक

**विषयः-** कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे. नियोजित वेळापत्रकानुसार दि. ६/८/२०१९ रोजी दुसऱ्या प्रवेश फेरीची वाटप यादी प्रसिध्द करण्यात आली. या प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारांनी दि. ०९/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) पर्यंत संबंधित महाविद्यालयामध्ये रिपोर्टिंग करावयाचे आहे. तथापि, सध्या राज्यातील पूरपरिस्थितीमुळे उमेदवारांना संबंधित महाविद्यालयात रिपोर्टिंग करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे सदरची मुदत वाढविण्याविषयी मागणी होत आहे.

ही बाब विचारात घेता, शासनाच्या मान्यतेने सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दुसऱ्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात रिपोर्टिंग करण्याची मुदत दि. १३/०८/२०१९ पर्यंत वाढविण्यात येत आहे. यानुसार पुढील वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | प्रस्तावित सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १. | दुसऱ्या प्रवेश फेरीचा रिपोर्टिंगचा कालावधी | ०७/०८/२०१९ ते ०९/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | ०७/०८/२०१९ ते १३/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) |
| २. | दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीअखेर रिक्त असलेल्या जागांची प्रसिध्दी | १०/०८/२०१९ | १४/०८/२०१९ |
| ३. | (i) तिसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी | १२/०८/२०१९ (सायं. ५.३० नंतर) | १६/०८/२०१९ (सायं. ५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | १३/०८/२०१९, १४/०८/२०१९ व १६/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | १७/०८/२०१९ ते २०/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) |

Scanned by CamScanner

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | प्रस्तावित सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| ४. | तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीअखेर रिक्त असलेल्या जागांची प्रसिध्दी | १७/०८/२०१९ | २१/०८/२०१९ |
| ५. | (i) चौथ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी (रूपांतरासह) | १९/०८/२०१९ (सायं. ५.३० नंतर) | २४/०८/२०१९ (सायं. ५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | २०/०८/२०१९ ते २२/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | २५/०८/२०१९ ते २८/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ६. | ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप निश्चित झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्याचा कालावधी. | २०/०८/२०१९ ते २३/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | २५/०८/२०१९ ते २९/०८/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | 'जागेवरील प्रवेश फेरी' साठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | २४/०८/२०१९ | ३१/०८/२०१९ |
| ८. | रिक्त जागांकरिता 'जागेवर प्रवेश फेरी' (**परिशिष्ट 'जी'** मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा' वर व **परिशिष्ट 'एच'** येथील कार्यपध्दतीनुसार) | २६-०८-२०१९ ते २९-०८-२०१९ | ०३-०९-२०१९ ते ०६-०९-२०१९ |
| ९. | संस्थास्तरीय कोटयातील जागा भरण्याचे वेळापत्रक | | |
| | (i) संकेतस्थळावर महाविद्यालयनिहाय उपलब्ध जागांची प्रसिध्दी | २९/०८/२०१९ | ०६/०९/२०१९ |
| | (ii) संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे व्यक्तीशः प्रवेशाकरिता अर्ज दाखल करण्याचा कालावधी | ३०/०८/२०१९ ते ३१/०८/२०१९ | ०७/०९/२०१९ व ०८/०९/२०१९ |
| | (iii) संबंधित संस्थेच्या / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर गुणवत्ता यादी / निवड यादीची प्रसिध्दी. | ०२/०९/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | १०/०९/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) |
| | (iv) निवड यादीतील उमेदवारांनी प्रवेश घेण्यासाठी, संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे मूळ कागदपत्रे व आवश्यक त्या शुल्काच्या धनाकर्षासह उपस्थित राहण्याचा कालावधी | ०३/०९/२०१९ ते ०५/०९/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | ११/०९/२०१९ ते १३/०९/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) |

Scanned by CamScanner

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| | (v) निवड यादीतील उमेदवार विहित कालावधीमध्ये उपस्थित नसल्यास, रिक्त असणाऱ्या जागा वरील क्र. (iii) येथील गुणवत्ता यादीतील उमेदवारां-मधून गुणवत्तेने भरण्याचा कालावधी. | ०६/०९/२०१९ ते ०७/०९/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) | १६/०९/२०१९ व १७/०९/२०१९ (सायं. ५.३० पर्यंत) |
| १०. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १९/०८/२०१९ | २६/०८/२०१९ |
| ११. | प्रवेश प्रक्रियेसाठीचा अंतिम दिनांक | १५/०९/२०१९ | ३०/०९/२०१९ |

राष्ट्रीय सुटया वगळता इतर सर्व शासकीय सुटयांच्या कालावधीत प्रवेश प्रक्रिया महाविद्यालयस्तरावर चालू राहील, याबाबत सर्व प्रवेशोच्छुक व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(आर. बी. भागडे भा प्र से)
महासंचालक

प्रत कार्यवाहीसाठीः-

१. मे. टेकनिक आयटी सोल्यूशन, लाईफ स्क्वेअर सोसायटी, ए ३०१, लोहगाव, पुणे ४७
यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक प्रवेशविषयक संकेतस्थळावर अपलोड करावे.

३. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर सदरचे परिपत्रक अपलोड करावे.

प्रत माहितीसाठीः-

१. मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
४. कक्ष अधिकारी, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

Scanned by CamScanner